मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन परिपत्रक क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.२१०/पापु.०७
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२, दिनांक- १६ मार्च,२००४.

पहाः- शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.२१०/ पापु.०७ दिनांक-१४ ऑक्टोबर,२००३.

**शासन परिपत्रकः-**

मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र्यदिनी जाहिर केलेल्या पाणी पुरवठा विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्यास प्रस्तावनेतील दिनांक १४.१०.२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली असून, केंद्र शासनाने पाणी पुरवठा विषयक योजनांचे राज्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट सन २००३-२००४ व सन २००४-२००५ या दोन वर्षात राबविण्यासाठी संदर्भीय शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार जिल्हा परिषदांना वाटून देण्यात आले आहे. **तथापि, हे उद्दिष्ट दोन वर्षाऐवजी एकाच वर्षात म्हणजे सन २००३-२००४ मध्ये पूर्ण करावयाचे आहे**. या योजनांसाठी सन २००४-२००५ वर्षाकरिता केंद्र शासन आणखी उद्दिष्ट ठरवून देणार आहे. त्यामुळे, संदर्भीय शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रातील रकाना क्रमांक ५, ८ व ११ मध्ये आपल्या जिल्ह्याच्या समोर दर्शविण्यात आलेले **उद्दिष्ट सन २००३-२००४ या वर्षात पूर्ण करण्यात यावे**.

२. मा.पंतप्रधानांनी जाहिर केलेल्या कार्यक्रमांमध्ये ९०% रक्कम केंद्र शासन देणार असून १०% लोकसहभाग आहे. लोकसहभागाची ही रक्कम लाभार्थ्यांकडून घ्यावयाची आहे. परंतु, लाभार्थी ही रक्कम भरु शकत नसतील तर ती, रक्कम संबंधित ग्रामपंचायतीस स्वतःच्या उत्पन्नातून भरण्यास मुभा देण्यात आली आहे. संबंधित ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती चांगली नसल्यास, ही रक्कम मा.खासदारांच्या / मा.आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून घेण्यास मुभा देण्यात आली आहे. परंतु, सध्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठीची आचारसंहिता लागू असल्याने मा.खासदारांच्या/ मा.आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून लोकसहभागाची ही रक्कम घेता येणार नाही. **अशा परिस्थितीत, या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर परिणाम होऊ नये म्हणून लोकसहभागाची रक्कम संबंधित लाभार्थी भरु शकत नसतील व संबंधित ग्राम पंचायतीची आर्थिक स्थितीही तूर्त चांगली नसल्यास जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचातीस देण्यात येणा-या विविध अनुदानाच्या रक्कमेमधून लोकसहभागाची ही रक्कम घेण्यास एक विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे**. परंतु, त्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीकडून तसे लेखी संमतीपत्र घेण्यात यावे.

३. राज्यामध्ये ब-याच जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई फार मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यासाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात येऊन त्यास जिल्हाधिका-यांकडून मंजूरी देण्यात येते. त्यानुसार **टंचाईअंतर्गत विंधण विहिर कार्यक्रमास मंजूरी देतांना या विंधण विहिरी मा.पंतप्रधानांनी जाहिर केलेल्या कार्यक्रमातूनच घेण्यात याव्यात. यासाठी आपणांस ठरवून देण्यात आलेले उद्दिष्ट आणखी वाढवून हवे असल्यास, तसा प्रस्ताव शासनाकडे व संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे यांच्याकडे तात्काळ पाठवावा.** ज्या जिल्ह्यांमध्ये टंचाई कृती आराखड्यामधील विंधण विहिरींचा कार्यक्रम मा.पंतप्रधांनांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमांतून राबवूनही मा.पंतप्रधानानी जाहिर केलेल्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट शिल्लक रहात असेल तर टंचाई कृती आराखड्याबाहेरील विंधण विहिरीची मागणी मा.पंतप्रधानांच्या कार्यक्रमांमधून पूर्ण करण्यास हरकत नाही. **परंतु, कुठल्याही परिस्थितीत, पंतप्रधानांच्या या कार्यक्रमातून उद्दिष्ट शिल्लक असताना टंचाई कृती आराखडयामधील विंधण विहीरीची कामे टंचाईच्या लेखाशिर्षातून (२२४५) करु नयेत.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
२. विभागीय आयुक्त (सर्व)
३. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
४. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
५. जिल्हाधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
९. तहसीलदार (सर्व)
१०. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
११. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१८. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१९. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२०. मंत्रालयातील सर्व विभाग
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
२२. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

---

एच-1200(1400-3-04)
D:\WS 07\Priministers programme impli D O from P S.doc